# मुंबई

# सातारा प्रतिनिधी

संपादक : एकनाथ दगडू गाडे

www.satarapratinidhi.com

- सोमवार, २ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०२६
- वर्ष : १४
- अंक : ३३
- पृष्ठ : ४
- किंमत : २ रुपए
- PRGI Regd. No: MAHMAR/2013/50698



जाहिरात करा, योग्य वाचकांपर्यंत पोहोचा

आपल्या व्यवसायाची, सेवा, उत्पादन, संस्था, कार्यक्रम किंवा सार्वजनिक उपक्रमाची माहिती प्रभावीपणे पोहोचवा.

व्यवसाय | संस्था | कार्यक्रम | उत्पादने आणि सेवा | सार्वजनिक उपक्रम

आपल्या जाहिरातीसाठी संपर्क साधा.

संपर्क : +91 98213 49985


## थोडक्यात

### रेल्वेत स्टेशन मास्तर पदासाठी भरती; २५ नोव्हेंबरपर्यंत अर्जाची मुदत

नवी दिल्ली वृत्तसंध्या

**नवी दिल्ली**: रेल्वे भरती मंडळाकडून (RRB) स्टेशन मास्तर पदासाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या पात्र उमेदवारांना २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. या भरतीतील जागांबाबत विविध अहवालांमध्ये तफावत असून, काही अहवालांनुसार १,२५० तर काहींनुसार १,२६५ पदे भरली जाणार आहेत. त्यामुळे उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर पदांची व विभागनिहाय रिक्त जागांची माहिती तपासावी.
या पदासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आवश्यक आहे. निवड प्रक्रियेत संगणक आधारित चाचणी (CBT), अभियोग्यता चाचणी (CBAT), कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणीचा समावेश आहे. उमेदवारांनी rrbapply.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज भरावा. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५०० रुपये, तर राखीव प्रवर्गासाठी २५० रुपये अर्ज शुल्क आहे. शुल्क भरण्याची अंतिम तारीख २७ नोव्हेंबर २०२६ आहे. निवड झालेल्या उमेदवारांना वेतन स्तर ६ नुसार दरमहा ३५,४०० रुपये मूळ वेतन, ४,२०० रुपये ग्रेड पे आणि नियमानुसार इतर भत्ते व लाभ मिळणार आहेत.



### 5 नगरसेवकांचा मोठा निर्णय, थेट शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश!

ठाणे प्रतिनिधी

ठाणे : आकोला मूर्तिजापूर नगरपरिषदेतील पाच अपक्ष नगरसेवकांनी आपल्या समर्थकांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. या प्रवेशामुळे अकोला जिल्ह्यात शिवसेनेची राजकीय ताकद वाढली आहे.
शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये संदीप दौलतराव सरनाईक, सारिता काळे पाटील, पूनम रवी मोडक, ममता कैलास महाजन आणि शुभांगी संदीप सरनाईक यांचा समावेश आहे. या पाचही नगरसेवकांनी ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय सहकारी ॲड. निलेश देशमुख यांची अकोल्यात भेट घेतली होती. त्यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.
याशिवाय अकोल्यातील शिवा मोहोड यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. मोहोड हे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष, महानंदचे संचालक, अकोला जिल्हा दूध संघाचे संचालक, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष तसेच अकोला महापालिकेचे माजी बांधकाम सभापती राहिले आहेत.
मूर्तिजापूर नगरपरिषदेत एकूण 25 जागा असून, यापूर्वी भाजपचे 11, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे 7, वंचित बहुजन आघाडीचे 5 आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे 2 नगरसेवक होते. पाच अपक्ष नगरसेवकांच्या शिवसेना प्रवेशामुळे नगरपरिषदेतील पक्षीय समीकरणांमध्ये बदल झाला असून शिवसेनेचे संख्याबळ वाढले आहे.



# चीनच्या पैशावर भारतात अराजकता माजवण्याचा डाव? फडणवीसांचा राहुल गांधींवर गंभीर आरोप

ठाणे प्रतिनिधी

**ठाणे**: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून देशातील राजकीय वातावरण तापले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्या ट्रस्टला चीनकडून आर्थिक मदत का मिळते, असा सवाल उपस्थित करत या पैशांच्या माध्यमातून भारतात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी केला.
ठाण्यात भाजप आणि महायुतीच्या वतीने आयोजित 'लोकतंत्र बचाव' पदयात्रेतील सभेत ते बोलत होते.




पाचपाखाडी परिसरातून सुरू झालेल्या या पदयात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री गणेश नाईक सहभागी झाले होते. यावेळी फडणवीस यांनी विरोधकांच्या आंदोलनावर टीका केली. लोकशाही वाचविण्याच्या नावाखाली संविधानाने निर्माण केलेल्या घटनात्मक संस्थांची बदनामी केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. इंदिरा गांधी यांच्या काळातील राजकीय परिस्थितीचा संदर्भ देत फडणवीस म्हणाले की, तोच इतिहास पुन्हा घडविण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत. दारू तीच, फक्त बाटली बदलली आहे, अशा शब्दांत त्यांनी राहुल गांधींवर टीका केली. नागरिकांचे मूलभूत अधिकार संपुष्टात आणण्याच्या दिशेने काँग्रेसची वाटचाल सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला. राहुल गांधी यांच्या व्हिएतनाम आणि थायलंड दौऱ्यांचा उल्लेख करत फडणवीस यांनी चीनकडून काँग्रेस आणि त्यांच्या ट्रस्टला मिळणाऱ्या कथित आर्थिक मदतीबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली. चीनकडून भारताच्या सुरक्षेला आव्हान दिले जात असताना या आर्थिक मदतीमागील कारण काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मात्र, या आरोपांच्या समर्थनार्थ सभेत कोणतेही ठोस दस्तऐवजी पुरावे सादर केल्याचे वृत्त नाही.
राहुल गांधी यांच्या हातातील लाल रंगाच्या संविधानाच्या प्रतीवरूनही फडणवीस यांनी टीका केली. लाल संविधान हा केवळ मुखवटा असून त्यामागे वेगळे षडयंत्र असल्याचा आरोप त्यांनी केला. नेपाळ, श्रीलंका आणि बांगलादेशातील घडामोडींचा संदर्भ देत त्यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. रिझर्व्ह बँक, नियंत्रक आणि महालेखापरीक्षक, संसद, निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय यांसारख्या संस्थांवर टीका करून देशात अराजकता निर्माण केली जात असल्याचा दावाही त्यांनी केला.
दुसरीकडे, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी इंडिया आघाडीने आंदोलन तीव्र केले आहे. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीवरून (एसआयआर) निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप करत रविवारी (१ नोव्हेंबर) दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीने सभेचे आयोजन केले. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका गांधी यांच्यासह विरोधी पक्षांचे प्रमुख नेते या आंदोलनात सहभागी झाले आहेत.
एकीकडे इंडिया आघाडी निवडणूक आयोगाच्या विरोधात आंदोलन करत असताना भाजपने ठाण्यात 'लोकतंत्र बचाव' पदयात्रा काढून विरोधकांना प्रत्युत्तर दिले. संविधान, लोकशाही आणि निवडणूक आयोगाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी व विरोधकांमधील राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

## ८५ वर्षांचा जाणता राजा मैदानात; शरद पवार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाणार!

मुंबई प्रतिनिधी

राज्यातील भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करणार आहेत. वयाच्या ८५व्या वर्षी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा त्यांचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. दिवाळीच्या आसपास हा दौरा होणार असून, दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी ते शासनस्तरावर पाठपुरावा करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही ते चर्चा करणार असल्याचे सांगितले जात आहे.
राज्यात दुष्काळ निवारणासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. ही मदत याच आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तसेच, मदतीची रक्कम खात्यात जमा झाल्यानंतर बँकांनी ती कर्जवसुलीसाठी कापून घेऊ नये, असे निर्देशही देण्यात आले आहेत.
दुष्काळाची तीव्रता वाढल्याने शेतकरी जनावरे विकू लागले असून, रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करत असल्याचे शरद पवार यांचे निरीक्षण आहे. घरदार आणि मुलांचे शिक्षण सोडून शहरांकडे जाण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असल्याने त्यांनी दुष्काळी भागांचा दौरा करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय, आणखी काही तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करण्याचा आणि सिंधुदुर्गातून चारा आणून दुष्काळग्रस्त भागांना उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार दौऱ्यात शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन सरकारकडे कोणत्या उपाययोजनांचा आग्रह धरतात, याकडे लक्ष लागले आहे.



## सांगलीचे पाणी अडवणारे तुम्ही कोण?' पडळकरांचा शंभूराजे देसाईंना सवाल

सांगली प्रतिनिधी

**सांगली**: सांगलीच्या पाणीप्रश्नावरून गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कालवा समितीच्या बैठकीत जोरदार खडाजंगी झाली. आमदार गोपीचंद पडळकर यांनी 'सांगलीचे पाणी अडवणारे तुम्ही कोण?' असा संतप्त सवाल उपस्थित केला. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला माजी खासदार संजयकाका पाटील, खासदार विशाल पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री जयकुमार गोरे ऑनलाइन सहभागी झाले, तर शंभूराजे देसाई यांनीही ऑनलाइन उपस्थित राहून आपण पाणी अडवले नसल्याचे स्पष्ट केले.
गेल्या आठ ते पंधरा दिवसांपासून सांगलीला पाणी मिळत नसल्याने कृष्णा नदीचे पात्र कोरडे पडले आहे. सांगलीत उपसाबंदी आणि वीजजोडण्या बंद असताना सातारा जिल्ह्यात पाणी उपसा सुरू असल्याचा मुद्दा लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला. कोयना धरणातील पाणीसाठा गतवर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे सांगत देसाईंनी समन्यायी पाणीवाटपाची भूमिका मांडली. म्हैसाळ व टेंभू योजनांचे आवर्तन सुरू करावे आणि वीज निर्मितीसाठी वापरले जाणारे पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी जयंत पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधींनी केली. सांगलीच्या नदीपात्रात प्रत्यक्ष पाणी सोडण्याची मागणीही त्यांनी केली.




## उद्धव ठाकरे-फडणवीस एकाच मंचावर; राऊत म्हणाले, 'पुढे काय होईल सांगता येत नाही!'

मुंबई प्रतिनिधी

**मुंबई**: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे 'महाराष्ट्राच्या हास्यरेषा' पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात एकाच मंचावर आल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. प्रशांत कुलकर्णी संपादित पुस्तकाच्या प्रकाशनानंतर खासदार संजय राऊत यांनी या भेटीवर सूचक विधान केले. "उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकत्र होते, हा ओलावा असतो. भविष्यात काय होईल सांगता येत नाही," असे राऊत म्हणाले. लोकशाहीत बदल आणि परिवर्तन होत असते. सत्तेवर कायम कोणीही राहत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.
भाजप नेते आशिष शेलार यांच्याबाबत बोलताना राऊत यांनी त्यांच्याशी प्रेमाने संवाद होत असल्याचे सांगितले. भाजपमध्ये शेलार यांच्यासोबत मांडीला मांडी लावून बसावे, असे नेते असल्याचेही ते म्हणाले.
राजकारणातील सूडाच्या कारवाईवर टीका करताना बाळासाहेब ठाकरे आणि अटलबिहारी वाजपेयी यांचा उल्लेख त्यांनी केला. तसेच वसई-विरारमधील राजकीय घडामोडींचा संदर्भ देत, सत्य समजल्यानंतर आपण आप्पांच्या पाठीशी उभे राहिल्याचेही राऊत यांनी सांगितले. त्यांच्या या विधानामुळे राज्यातील राजकीय चर्चांना नवा विषय मिळाला आहे.



## सातारा मेडिकल कॉलेजच्या बालरोग विभागासाठी १३.५० कोटींचा निधी मंजूर

सातारा प्रतिनिधी

सातारा येथील छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बालरोग चिकित्साशास्त्र विभाग आणि एनआयसीयू सुसज्ज करण्यासाठी राज्य शासनाने १३ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली आहे. यंत्रसामग्री व आवश्यक साधनसामग्री खरेदीसाठी हा निधी मंजूर झाला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानंतर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने खरेदीला मंजुरी दिली.



या निधीमुळे नवजात बालकांच्या उपचारांसाठी आवश्यक एनआयसीयू सुविधांसह बालरोग विभागातील वैद्यकीय उपकरणे उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्यासह परिसरातील बालरुग्णांना अधिक चांगल्या उपचार सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. मेडिकल कॉलेज आणि रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करून जिल्ह्यातील रुग्णांना स्थानिक पातळीवर दर्जेदार उपचार मिळावेत, हा आपला प्रयत्न असल्याचे शिवेंद्रसिंहराजे यांनी सांगितले. निधी मंजूर केल्याबद्दल त्यांनी राज्य सरकारचे आभार मानले.

## नवनिर्वाचित आमदार हर्षदा देशमुख-जाधव यांचे साताऱ्यात स्वागत

सातारा प्रतिनिधी

**सातारा**: पुणे पदवीधर मतदारसंघातून विजय मिळविल्यानंतर नवनिर्वाचित आमदार हर्षदा देशमुख-जाधव यांचे प्रथमच सातारा जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने साताऱ्यातील राष्ट्रवादी भवन येथे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.
सत्काराला उत्तर देताना आमदार देशमुख-जाधव यांनी पदवीधर मतदारांनी दाखविलेल्या विश्वासाला पात्र ठरत त्यांच्या समस्या व प्रलंबित प्रश्न विधा\न परिषदेत सातत्याने मांडून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.
यावेळी बाळासाहेब पाटील यांनी निवडणुकीत पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केल्याबद्दल अभिनंदन केले. या कार्यक्रमाला माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख, मानसिंगराव जगदाळे, देवराज पाटील, राजेश पवार, नितीन शिंदे, राजकुमार पाटील, सचिन गोगावले, समीर घाटगे, अतुल शिंदे, शफिक शेख, अर्चनाताई देशमुख, सनी आवळे, उमेश देशमुख, सुनील काळेकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मुंबईच्या समुद्रात तरंगत्या होर्डिंग्जना विरोध; आदित्य ठाकरेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई प्रतिनिधी

मुंबईच्या किनारपट्टीचे नैसर्गिक सौंदर्य खराब करणाऱ्या समुद्रातील तरंगत्या होर्डिंग्जच्या निर्णयाला शिवसेना नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी विरोध केला आहे. याप्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून निर्णय थांबवण्याची मागणी केली आहे. प्रदूषणामुळे मुंबईतील अनेक भागांतून समुद्राचे दृश्य स्पष्ट दिसत नाही. त्यातच समुद्रात जाहिरातींचे होर्डिंग्ज लावल्यास उरलेले नैसर्गिक सौंदर्यही नष्ट होईल, असे आदित्य ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे. जमिनीवरील प्रदूषणाचा त्रास सहन करणाऱ्या मुंबईकरांवर हा आणखी एक अन्याय असल्याची टीकाही त्यांनी केली.
रात्रीच्या वेळी एलईडी होर्डिंग्जमुळे नागरिकांना होणारा त्रास रोखण्यासाठी तसेच शहरातील होर्डिंग्जच्या संख्येवर मर्यादा घालण्यासाठी निश्चित धोरण असावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. कंत्राटदारांच्या आर्थिक हितापेक्षा मुंबईचे सौंदर्य आणि नैसर्गिकता जपण्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन करत त्यांनी या निर्णयात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली. हा निर्णय बेजबाबदार असून त्यात संभाव्य भ्रष्टाचाराचा संशय असल्याचा आरोपही त्यांनी केला.



# मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना ३३ हजार रुपये बोनस

मुंबई प्रतिनिधी

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी २०२६ साठी ३३ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा महापौर रितू तावडे यांनी २८ ऑक्टोबर रोजी केली. नोव्हेंबर महिन्याच्या नियमित पगारासोबत ही रक्कम दिली जाणार आहे. महापौर दालनात झालेल्या बैठकीत उपमहापौर संजय घाडी, विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर, सभागृहनेते गणेश खणकर, विविध पक्षांचे गटनेते, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.
राज्यात कमी पावसामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शासनाने निकषांनुसार ३०० तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. या परिस्थितीचा विचार करून महापालिका प्रशासन, पदाधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी एकमताने ३३ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला.
महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सानुग्रह अनुदानाची रक्कम कर्मचाऱ्यांच्या सणासुदीच्या खर्चासाठी उपयोगी ठरणार आहे. नोव्हेंबरच्या वेतनासोबतच ही रक्कम मिळणार असल्याने कर्मचाऱ्यांना दिवाळीचे नियोजन करणे सोयीचे होणार आहे.
या अनुदानामुळे महापालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळीचा सण आनंदात साजरा करता येणार आहे. नियमित वेतनासोबत अनुदानाची रक्कम एकत्रित दिली जाणार असल्याने कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या खर्चासाठी आर्थिक मदत मिळणार आहे.



# संपादकीय

## तपासाच्या यशोगाथेत दडलेला संवेदनशील प्रश्न

संपादक : एकनाथ गाडे

मुंबईसारख्या गजबजलेल्या आणि धावपळीच्या महानगरातून जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत ८७५ अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याची किंवा त्या बेपत्ता झाल्याची नोंद होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. यातील ८४६ मुलींचा शोध लावण्यात मुंबई पोलिसांना यश आले असून, तपासाचे हे प्रमाण सुमारे ९७ टक्के आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ९४१ गुन्हे नोंदवले गेले होते, त्या तुलनेत यावर्षी गुन्ह्यांच्या संख्येत किंचित घट झाली असली आणि पोलिसांची कामगिरी कौतुकास्पद असली, तरी केवळ या आकडेवारीवर समाधान मानून चालणार नाही. या आकडेवारीमागे दडलेले गंभीर सामाजिक, कौटुंबिक आणि मानसिक प्रश्न समजून घेण्याची वेळ आता आली आहे.

किशोरवय हा मानवी जीवनातील अत्यंत संवेदनशील आणि स्थित्यंतराचा काळ असतो. या वयात मैत्री, प्रेमसंबंध, शिक्षणाचा ताण आणि स्वातंत्र्याची वाढती अपेक्षा यांसारख्या गोष्टी मुलींच्या मनावर मोठा ताण निर्माण करतात. पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार, केवळ प्रेमप्रकरणांशिवाय घरातील सततचे वाद, मुला-मुलींमधील भेदभाव, संवादहीनता तसेच शारीरिक व शाब्दिक अत्याचार यांसारख्या कारणांमुळेही अनेक मुली घर सोडण्याचा टोकाचा निर्णय घेतात. अनेकदा घरातील कौटुंबिक कलह किंवा ताणतणाव कोणालाही सांगता न आल्याने, त्या बाहेरील व्यक्तींच्या किंवा समाजमाध्यमांवरील अनोळखी लोकांच्या खोट्या आश्वासनांवर आणि आमिषांवर विश्वास ठेवतात. जुलै महिन्यात घडलेल्या काही घटनांमधून हे स्पष्ट होते की, प्रत्येक बेपत्ता प्रकरणामागील पार्श्वभूमी आणि कारणे पूर्णपणे वेगळी असतात. त्यामुळे सरसकट निष्कर्ष काढण्यापूर्वी संबंधित मुलीची बाजू समजून घेणे अत्यंत गरजेचे ठरते.

पोलीस तपासात बेपत्ता मुलगी सुखरूप सापडणे हा कायदेशीर प्रक्रियेचा आणि तपासाचा शेवट असू शकतो, परंतु त्या मुलीच्या सुरक्षित भविष्याची ती खरी सुरुवात असायला हवी. मुलगी घरी परतल्यानंतर तिच्यावर दोषारोप करणे, तिला सतत टोमणे मारणे किंवा तिच्यासोबत घडलेल्या अनुभवांकडे दुर्लक्ष करणे ही पालकांची मोठी चूक ठरू शकते. यामुळे मुलीच्या मनात अधिक भीती आणि नैराश निर्माण होऊन ती पुन्हा घर सोडण्याचा धोका पत्करू शकते. यावर मात करण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशकांच्या मदतीने मुलीच्या भावना, अडचणी आणि तिच्या मानसिक स्थितीचा वेध घेणे आवश्यक आहे. जर घरातील वातावरणच असुरक्षित किंवा अत्याचाराचे असल्याचे निष्पन्न झाले, तर बालकल्याण समिती आणि बालसंरक्षण यंत्रणांच्या माध्यमातून तिच्या योग्य पुनर्वसनाची आणि सुरक्षेची खात्री करणे गरजेचे ठरते.

सध्याच्या डिजिटल युगात प्रत्यक्ष भेटींबरोबरच सोशल मीडियावरून होणाऱ्या ओळखी आणि त्यातून दिले जाणारे चांगल्या आयुष्याचे किंवा विवाहाचे आमिष अल्पवयीन मुलींना घर सोडण्यास प्रवृत्त करत आहे. या समस्येचे गांभीर्य ओळखून केवळ कायद्याच्या धाकाने हा प्रश्न सुटणार नाही, तर कौटुंबिक स्तरावर संवादाचे पूल बांधणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांशी मित्रत्वाचे नाते निर्माण करून त्यांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत. मुलींचा शोध लागणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच त्यांना घरात सुरक्षितता आणि आपलेपणा मिळवून देणे ही काळाची गरज आहे. जर आपण या समस्येच्या मुळाशी जाऊन कौटुंबिक व सामाजिक पातळीवर योग्य पावले उचलली, तरच अशा घटनांची पुनरावृत्ती रोखणे शक्य होईल.

# 'सह्याद्रीच्या छाताडावर कुऱ्हाड'...!

सह्याद्रीच्या छाताडावर कुऱ्हाड चालवायची, शेकडो वर्षे निसर्गाच्या सान्निध्यात उभे असलेले वृक्ष जमीनदोस्त करायचे, वन्यजीवांचे अधिवास उद्ध्वस्त करायचे आणि वरून विकासाचा ढोल बडवायचा! हा विकास आहे की निसर्गाच्या विनाशाचा सरकारी कार्यक्रम? रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील साईडोंगर परिसरातील प्रस्तावित टोरंट पॉवरच्या पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्पामुळे हा प्रश्न महाराष्ट्राच्या दारात उभा ठाकला आहे. वीज निर्माण करण्यासाठी जंगलच नष्ट करायचे असेल, तर सरकारच्या विकासाच्या व्याख्येला आग लावण्याची वेळ आली आहे! कारण सह्याद्री ही सरकारची खासगी मालमत्ता नाही. हा महाराष्ट्राचा नैसर्गिक वारसा आहे. पुढच्या पिढ्यांच्या हक्काची संपत्ती आहे. तिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार कोणाला दिला?

**हरित ऊर्जेच्या नावाखाली हिरव्या जंगलांची कत्तल!**

कर्जतच्या साईडोंगर परिसरात प्रस्तावित प्रकल्पासाठी शेकडो एकर वनजमीन वापरण्याची आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वृक्षतोडीच्या आकड्यांबाबत वेगवेगळे दावे समोर येत असून, त्यांची अधिकृत कागदपत्रांद्वारे पडताळणी होणे आवश्यक आहे. संपूर्ण प्रकल्पामुळे अडीच लाखांहून अधिक झाडे तोडली जाऊ शकतात, असाही दावा केला जात आहे. हे आकडे अंतिम



उमेश गायगवळे
9769020286

सत्य मानण्यापूर्वी सरकारने त्यांची स्पष्टता द्यावी. मात्र, आकड्यांवर पडदा टाकून संभाव्य पर्यावरणीय संकटाचे गांभीर्य कमी करता येणार नाही.

पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमधून ऊर्जेची साठवण आणि गरजेनुसार वीजपुरवठा करण्यास मदत होऊ शकते. परंतु एखादे तंत्रज्ञान उपयुक्त आहे म्हणून त्यासाठी कोणतीही पर्यावरणीय किंमत मोजण्याची मुभा मिळत नाही. हरित ऊर्जेच्या नावाखाली हजारो झाडे तोडली जाणार असतील, तर या हरितपणाचा अर्थ तरी काय? एका बाजूला पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा करायच्या आणि दुसऱ्या बाजूला जंगलांवर घाव घालायचे, हा दुटप्पीपणा कशासाठी?

**वीज निर्माण करण्याचे पर्याय शोधा; पण पर्यायांच्या शोधात निसर्गाचा अंत करू नका!**

सह्याद्री म्हणजे केवळ डोंगर नाही, तो महाराष्ट्राचा श्वास आहे!

पश्चिम घाट हा जगातील जैवविविधतेने समृद्ध असलेल्या महत्त्वाच्या नैसर्गिक प्रदेशांपैकी एक आहे. येथे आढळणाऱ्या वनस्पती, उभयचर, सरपटणारे प्राणी, पक्षी आणि सस्तन प्राण्यांच्या अनेक प्रजातींचे अस्तित्व विशिष्ट अधिवासावर अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या सह्याद्रीत बिबट्या, अस्वल, सांबर, भेकर, शेकरू आणि विविध दुर्मिळ पक्ष्यांच्या प्रजातींचे संवर्धन महत्त्वाचे आहे. यांपैकी कोणत्या प्रजाती साईडोंगर परिसरात प्रत्यक्ष आढळतात, याची खात्री करण्यासाठी सखोल वैज्ञानिक सर्वेक्षण आवश्यक आहे. जंगल तोडणे म्हणजे केवळ झाडे पाडणे नव्हे. त्या वृक्षांवर अवलंबून असलेली घरटी, अन्नसाखळी, सूक्ष्मजीव, कीटक आणि वन्यजीवांच्या हालचालींचे मार्ग यांनाही धक्का बसू शकतो. अधिवास नष्ट झाल्यानंतर प्राणी मानवी वस्त्यांकडे वळण्याची शक्यता वाढते. परिणामी मानव आणि वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ शकतो. या संघर्षात नुकसान कोणाचे होणार?



माणसाचेही आणि मुक्या जीवांचेही!

शेकडो वर्षे जगलेल्या वृक्षांची किंमत लावून ती भरून काढता येत नाही. आज एखादे झाड तोडले, तर उद्या त्याच उंचीचे आणि तितकीच पर्यावरणीय सेवा देणारे झाड उभे राहणार नाही. वृक्षारोपणाच्या छायाचित्रांनी जंगलतोडीची जखम भरून निघत नाही. सरकारने हे साधे सत्य समजून घ्यावे.

**पाणी हवे; मग पाण्याचे नैसर्गिक स्रोत उद्ध्वस्त कशाला?**

सह्याद्री महाराष्ट्राच्या जलसुरक्षेचा महत्त्वाचा आधार आहे. जंगलातील वृक्षराजी पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करते, मातीची धूप कमी करते आणि स्थानिक जलचक्र टिकवून ठेवण्यास हातभार लावते. जंगलांच्या ऱ्हासामुळे या प्रक्रियांवर परिणाम होऊ शकतो. त्याचे नेमके स्वरूप आणि प्रमाण स्थानिक भौगोलिक परिस्थिती व वैज्ञानिक अभ्यासावर अवलंबून असते.

मग पाणीटंचाईवर मात करण्याच्या घोषणा करणाऱ्या सरकारने जंगलांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांच्यावर कुऱ्हाड चालवण्याचा धोका का पत्करावा? जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा काटकसरीने वापर आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन या उपायांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. विकासाच्या नावाखाली निसर्गाची नैसर्गिक यंत्रणाच कमकुवत करायची आणि नंतर पर्यावरणीय संकटांवर कोट्यवधी रुपये खर्च करायचे, ही कसली दूरदृष्टी?

**२३ प्रकल्पांचा प्रश्न; सरकारने जनतेला अंधारात का ठेवावे?**

माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी महाराष्ट्रातील २३ प्रस्तावित पंप्ड स्टोरेज प्रकल्पांची यादी प्रसिद्ध केल्याचे वृत्त आहे. या प्रकल्पांचा संबंध रायगड, पुणे, सातारा, जळगाव, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांशी असल्याचे सांगितले जाते. या सर्व प्रकल्पांची सद्यस्थिती, वनजमिनीवरील परिणाम आणि पर्यावरणीय मंजुरी स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक आहे.

प्रश्न एका साईडोंगरचा नाही. महाराष्ट्रातील नैसर्गिक संपत्तीचे नियोजन कोणत्या निकषांवर केले जात आहे, हा खरा प्रश्न आहे. प्रकल्पांच्या फायद्यांची आकडेवारी जनतेसमोर मांडताना पर्यावरणीय नुकसानीची माहितीही तेवढ्याच पारदर्शकतेने का मांडली जात नाही? स्थानिक जनतेच्या आक्षेपांना उत्तर देण्याऐवजी त्यांना विकासविरोधी ठरवणे हा सोपा मार्ग आहे. पण लोकशाहीत जनतेचे प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेता येत नाही.

सरकारने सर्व प्रकल्पांचे पर्यावरणीय परिणाम, वृक्षतोडीचे अधिकृत आकडे, वन्यजीव सर्वेक्षण, पर्यायी जागांचा अभ्यास आणि पुनर्वसनाच्या योजना सार्वजनिक कराव्यात. पर्यावरणीय मंजुरीच्या अटींची स्वतंत्र देखरेख करावी. गंभीर आणि अपरिवर्तनीय पर्यावरणीय हानीची शक्यता असल्यास प्रकल्पाच्या आराखड्यात बदल करावा किंवा पर्यायांचा विचार करावा. केवळ गुंतवणूक आणि मेगावॅटच्या आकड्यांनी विकासाचे यश ठरत नाही.

**सह्याद्री विकायला काढला आहे काय?**

सरकारने एक गोष्ट लक्षात ठेवावी. निसर्गाचा विनाश करून उभारलेल्या विकासाच्या इमारतीचा पाया कधीही भक्कम असू शकत नाही. जंगल जळाले, जलस्रोत आटले, जैवविविधता नष्ट झाली आणि वन्यजीवांचे अधिवास संपले, तर त्याची किंमत केवळ आजची पिढी नव्हे, तर पुढच्या अनेक पिढ्या मोजतील.

उद्योगांना वीज हवी, राज्याला विकास हवा आणि जनतेला रोजगार हवा; पण या सगळ्यांसाठी निसर्गाचा बळी देणे अपरिहार्य आहे, असे कोणीही सिद्ध केलेले नाही. पर्यावरणाचे नुकसान कमीत कमी होईल, अशा पर्यायांचा शोध घेणे हीच खरी शासनाची कसोटी आहे.

सह्याद्रीच्या हिरव्या छाताडावर कुऱ्हाड चालवून विकासाचा लाल गालिचा अंथरण्याचा प्रयत्न थांबला पाहिजे! सरकारने साईडोंगरच्या प्रश्नाकडे केवळ एका प्रकल्पाचा विषय म्हणून पाहू नये. हा प्रश्न महाराष्ट्राच्या पर्यावरणीय भवितव्याचा आहे. सह्याद्री वाचवणे म्हणजे केवळ झाडे वाचवणे नव्हे; तर पाणी, माती, जैवविविधता आणि मानवी जीवनाचे संरक्षण करणे होय.

सह्याद्री टिकला तरच महाराष्ट्राची नैसर्गिक समृद्धी टिकेल. विकासाच्या नावाखाली महाराष्ट्राचा श्वास हिरावून घेताय...! जंगल उद्ध्वस्त करून कसली हरितक्रांती करता...?

## सातारा जिल्हा बँकेच्या १२ जागांसाठी सत्तासंग्राम; गोरे बंधू, देसाई-पाटणकर आणि नाईक निंबाळकरांच्या लढतीकडे लक्ष

सातारा प्रतिनिधी

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीला आज (रविवार, १ नोव्हेंबर) सुरुवात झाली असून, उर्वरित १२ संचालकपदांसाठी मतदान होत आहे. एकूण २१ जागांपैकी ९ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे आजच्या निवडणुकीत २८ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. या निवडणुकीत दोन मंत्र्यांसह जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

माण तालुक्यात ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे आणि त्यांचे बंधू शेखर गोरे यांच्यात थेट लढत होत असून, मनोजकुमार पोळ यांच्यामुळे येथे तिरंगी सामना रंगला आहे. पाटणमध्ये पालकमंत्री शंभूराज देसाई आणि सत्यजितसिंह पाटणकर यांच्यात प्रतिष्ठेची लढत होत आहे. तर फलटणमध्ये संजीवराजे नाईक निंबाळकर आणि समशेरसिंह नाईक निंबाळकर यांच्यात चुरस निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील ११ तालुक्यांमधील ११ मतदान केंद्रांवर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होत आहे. एकूण २ हजार २१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, प्रक्रियेसाठी ११५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्रांवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

फलटणमधील मतदान केंद्रावर आज सकाळी माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर आणि माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांची भेट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या भेटीकडेही विशेष लक्ष दिले जात आहे.

उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी झालेल्या राजकीय घडामोडींनंतर नऊ जागा बिनविरोध झाल्या. महायुतीतील घटक पक्षांमध्ये जागावाटप आणि स्थानिक राजकीय समीकरणे जुळवण्याचे प्रयत्न झाले; मात्र काही मतदारसंघांतील संघर्ष कायम राहिला.

आजच्या मतदानानंतर मंगळवार, ३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. जिल्हा बँकेवरील वर्चस्व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे मानले जात असल्याने या निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



## फुटबॉलपटू प्रणव गेला, पण सहा जणांना दिले जीवदान

कोल्हापूर, प्रतिनिधी

**कोल्हापूर**: राधानगरी तालुक्यातील केळोशी बुद्रुक येथील कुंभारवाडीचा २२ वर्षीय राज्यस्तरीय फुटबॉलपटू आणि तायक्वांदोमध्ये डबल ब्लॅक बेल्ट मिळवलेला प्रणव संभाजी कुंभार याचे ब्रेन स्ट्रोकमुळे निधन झाले. मात्र, त्याच्या अवयवदानामुळे सहा जणांना जीवनदान मिळाले.

गेल्या रविवारी सकाळी खेळताना प्रणवला ब्रेन स्ट्रोक होऊन मेंदूत रक्तस्त्राव झाला. खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला ब्रेन डेड घोषित केले. दोन महिन्यांपूर्वी सराव करताना पडल्यामुळे त्याच्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर त्याला सतत डोकेदुखीचा त्रास होत होता. मात्र, त्याने त्याकडे दुर्लक्ष केले होते.

प्रणवचे चुलते भगवंत कुंभार यांच्यासह कुटुंबीयांनी अवयवदानाचा निर्णय घेतला. मंगळवारी त्याची फुप्फुसे विमानाने चेन्नईला पाठवण्यात आली, तर स्वादुपिंड, हृदय, आतडे, किडनी आणि नेत्रपटल हे अवयव ग्रीन कॉरिडॉरमार्फत पुण्याला पाठवण्यात आले.

चार महिन्यांपूर्वी प्रणवच्या वडिलांचे निधन झाले होते. त्याच्या पश्चात आई आणि मोठा भाऊ असा परिवार आहे. ॲस्टर आधार हॉस्पिटलमध्ये प्रणवचे मित्र आणि खेळाडूंनी 'प्रणव कुंभार अमर रहे'च्या घोषणा देत त्याला श्रद्धांजली वाहिली.



## मुंबईत 'डॅझलिंग लाईट' मोहिमेत १२,५८५ वाहनांवर कारवाई; ८८.४७ लाखांचा दंड

सुधाकर नाडर, मुंबई

मुंबई वाहतूक पोलिसांकडून रात्री वाहनांच्या तीव्र प्रकाशामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी 'डॅझलिंग लाईट' विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत १ जून ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मुंबईतील ४१ वाहतूक विभागांमध्ये १२,५८५ वाहनांवर मोटार वाहन कायदा व संबंधित नियमांनुसार कारवाई करण्यात आली. संबंधित वाहनचालकांना एकूण ८८ लाख ४७ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. वाहनांवरील अनधिकृत फ्लॅशलाईट्स, एलईडी बार आणि तीव्र प्रकाश देणाऱ्या फॅन्सी हेडलाईट्समुळे समोरून येणाऱ्या चालकांची दृष्टी काही क्षणांसाठी बाधित होऊन अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे रात्री वाहन चालवताना लो-बीमचा वापर करावा, अनधिकृत दिवे टाळावेत आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन मुंबई वाहतूक पोलिसांनी केले आहे. अपघात रोखण्यासाठी ही मोहीम पुढेही सुरू राहणार आहे.




## मुंबईच्या देवनारमध्ये अवैध गॅस सिलिंडरचा साठा जप्त; ४.४२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

मुंबई प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील देवनार येथे एचपीसीएल कंपनीच्या गॅस सिलिंडरची अनधिकृत साठवणूक केल्याप्रकरणी शिधावाटप विभागाने कारवाई केली. या कारवाईत टेम्पोसह गॅस सिलिंडर असा अंदाजे ४ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अणुशक्तीनगरच्या शिधावाटप अधिकारी सोनाली धांदराणेकर, शिधावाटप निरीक्षक राकेश पाटील, नवीन कानपिल्लेवार, राजेंद्र पाटील, स्वप्नील देसले, विवेक महाजन आणि राजेश कोलगुडे यांचा या कारवाईत समावेश होता. शिधावाटप विभागाचे एसीआर प्रदीप काळे यांनी ही माहिती दिली.

गॅस सिलिंडरची अनधिकृत साठवणूक आणि वितरण यामुळे नियमांचे उल्लंघन होत असल्याने अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिधावाटप विभागाकडून कारवाई केली जाते. देवनारमधील या कारवाईमुळे अनधिकृत साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध विभागाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

अनधिकृतरीत्या गॅस सिलिंडरची साठवणूक व वितरण करणाऱ्यांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि गॅस सिलिंडरच्या वितरणातील अनियमितता रोखण्यासाठी विभागाकडून तपासणी व कारवाई केली जात आहे.




## मुंबईत आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश; ५ आफ्रिकन, ३ भारतीयांसह आठ आरोपी अटकेत

नवी मुंबई, प्रतिनिधी

नवी मुंबई : पोलिसांनी आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी रॅकेटचा पर्दाफाश करत आठ आरोपींना अटक केली. यामध्ये पाच आफ्रिकन नागरिक आणि तीन भारतीयांचा समावेश आहे. मुंब्रा परिसरात राहून हे आरोपी ड्रग्ज तस्करी करत असल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या कारवाईत दोन कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अमली पदार्थांच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी दिवा-मुंब्रा परिसरात सापळा रचला. पाच पोलीस अधिकारी आणि २० पोलीस अंमलदारांच्या पथकाने मुंब्रा पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. यावेळी २ किलो १८ ग्रॅम एमडी ड्रग्ज, ३१६.५ ग्रॅम कोकेन आणि सहा महागडे मोबाईल फोन जप्त करण्यात आले.

या प्रकरणात अकुबा केनेथ आणि संडे इझिक या नायजेरियन नागरिकांनाही दिवा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. ड्रग्जचा पुरवठा कुठून होत होता आणि या रॅकेटची व्याप्ती किती आहे, याचा पुढील तपास नवी मुंबई पोलीस करत आहेत.



# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी पुण्यातील २९ नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन

■ पुणे प्रतिनिधी

पुणे : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुणे महापालिकेतील २९ नगरसेवकांनी सप्टेंबर महिन्याचे संपूर्ण मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय घेतला. या मानधनातून जमा झालेला धनादेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा आणि त्यांच्या मदतीसाठी हातभार लावता यावा, या उद्देशाने नगरसेवकांनी हे योगदान दिले. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांना मदत मिळावी, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष सुनील टिंगरे, महापौर मंजुषा नागपुरे आणि पक्षाचे नगरसेवक उपस्थित होते. एक महिन्याचे मानधन मदतनिधीस देऊन नगरसेवकांनी सामाजिक उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न केला.

संकटाच्या काळात गरजूंच्या मदतीसाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे, हीच लोकसेवेची खरी भावना असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.



## कट्टर विरोधकांच्या जाहीर व्यासपीठावर दिलखुलास गप्पा; शिवेंद्रराजेंचा पुढाकार

■ सातारा प्रतिनिधी

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी महायुतीच्या घटक पक्षांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर हे अनेक वर्षांनंतर प्रथमच एकाच व्यासपीठावर आले.

एकमेकांवर टीका करण्याची संधी न सोडणारे हे दोन्ही नेते व्यासपीठावर मात्र खेळीमेळीच्या वातावरणात दिलखुलास गप्पा मारताना दिसले. विशेष म्हणजे, रामराजे नाईक निंबाळकर यांनीच चर्चेची सुरुवात केल्याचे दिसून आले. यावेळी मंत्री मकरंद पाटील हेही जवळ उपस्थित होते.

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे नेते या मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आले होते. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गोरे आणि रामराजे यांच्यात समन्वय साधण्यासाठी केलेल्या प्रयत्नाची जिल्ह्यात चर्चा सुरू आहे.

जयकुमार गोरे आणि रामराजे नाईक निंबाळकर यांच्यातील राजकीय संघर्ष पश्चिम महाराष्ट्रात परिचित आहे. दोन्ही नेते अनेकदा एकमेकांवर टीका करताना दिसले आहेत. त्यामुळे एकाच व्यासपीठावर त्यांच्यात रंगलेल्या अनौपचारिक चर्चेने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने घडलेल्या या भेटीतून दोन्ही नेत्यांमधील संवादाला नवी दिशा मिळणार का, याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे.



## भारताने गाठली उपांत्य फेरी; जपानचा ४-१ ने पराभव

■ जालंधर

जालंधर : पुरुषांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारतीय संघाने विजयी घोडदौड कायम राखत सलग तिसरा विजय नोंदवला. जपानचा ४-१ असा पराभव करून भारताने दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला. आघाडीवीर अभिषेक नैनच्या शानदार दोन गोलमुळे भारताच्या विजयाचा मार्ग सुकर झाला.

अभिषेकने ११व्या आणि ५१व्या मिनिटाला मैदानी गोल केले. कर्णधार हरमनप्रीत सिंगने ४७व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर गोल नोंदवला, तर विष्णूकांत सिंगने ५६व्या मिनिटाला चौथा गोल केला. जपानकडून शोता यामाडाने १५व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकवर एकमेव गोल केला. सामन्याच्या सुरुवातीला जपानने आक्रमक खेळ करत दुसऱ्याच मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळवला. मात्र, त्यांना गोल करता आला नाही. ११व्या मिनिटाला हार्दिक सिंग आणि सुखजीत सिंग यांच्या सुरेख पासनंतर अभिषेकने गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. पहिल्या सत्राच्या अखेरीस पेनल्टी स्ट्रोकवर जपानने बरोबरी साधली. मध्यंतरापर्यंत सामना १-१ असा बरोबरीत होता.

अंतिम सत्रात भारतीय खेळाडूंनी आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. हरमनप्रीतने ४७व्या मिनिटाला गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अभिषेकने दुसरा गोल केला. अखेर ५६व्या मिनिटाला विष्णूकांतने गोल करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताचा पुढील सामना गेल्या रविवारी मलेशियाविरुद्ध झाला होता.



## मुंबईत लॉटरीशिवाय म्हाडाचे घर मिळणार; ३०० ते ४०० घरांची विक्री होण्याची शक्यता

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई : मुंबईत हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी म्हाडाकडून लॉटरीशिवाय घर खरेदीची संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मुंबई मंडळाकडून लॉटरीत समावेश करूनही विक्रीविना शिल्लक राहिलेल्या घरांची 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर विक्री करण्याची तयारी सुरू आहे. या नव्या टप्प्यात सुमारे ३०० ते ४०० घरांचा समावेश असण्याची शक्यता असून, दिवाळीनंतर जाहिरात प्रसिद्ध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, अधिकृत तारीख आणि घरांची अंतिम संख्या अद्याप जाहीर झालेली नाही.

दादर, जुहू, लोअर परळ, ताडदेव, भायखळा आणि वडाळा यांसारख्या परिसरांतील काही घरांच्या किमती जास्त असल्याने त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. फेब्रुवारी २०२६ मध्ये म्हाडाने याच पद्धतीने ११८ सदनिकांच्या विक्रीची प्रक्रिया जाहीर केली होती. आता शिल्लक घरांच्या किमती कमी करण्याचाही पर्याय विचाराधीन असल्याचे वृत्त आहे. मात्र, दरकपात आणि त्यासंबंधीचे निकष अद्याप स्पष्ट झालेले नाहीत. इच्छुकांनी म्हाडाच्या अधिकृत जाहिरातीत पात्रता, घरांच्या किमती, अनामत रक्कम आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती तपासावी.




## कोकणातून हापूसची पहिली पेटी वाशी बाजारपेठेत रवाना

■ रत्नागिरी प्रतिनिधी

रत्नागिरी: नव्या हंगामातील देवगड हापूस आंब्याची पहिली पेटी २९ ऑक्टोबर रोजी संकष्टी चतुर्थीच्या मुहूर्तावर सिंधुदुर्गातून वाशी बाजारपेठेत रवाना झाली. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतून यंदाच्या हंगामात मुंबईला पाठवण्यात आलेली ही पहिली पेटी ठरली आहे.

विजयदुर्ग-घडीवाडी येथील नीलेश बांदकर आणि त्यांच्या बंधूंनी साडेसहा डझन हापूस आंब्यांची पेटी वाशी बाजारपेठेत पाठवली. नव्या हंगामातील पहिली पेटी बाजारात पाठवण्याचा मान बांदकर बंधूंना मिळाला आहे.

यंदा कोकणात आंबा हंगामाच्या सुरुवातीलाच पहिली पेटी बाजारपेठेत दाखल झाली असली, तरी आंबा उत्पादनाच्या दृष्टीने परिस्थिती अद्याप पोषक झालेली नाही. रत्नागिरी जिल्ह्यात अनेक दिवसांपासून पाऊस झालेला नाही, तर थंडीलाही अद्याप सुरुवात झालेली नाही. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये आंब्याच्या झाडांना अजून मोहोर आलेला नाही. अशा परिस्थितीत देवगड हापूसची पहिली पेटी वाशी बाजारपेठेत रवाना झाल्याने नव्या हंगामाची सुरुवात झाली आहे.



## मुंबई-बंगळुरू वंदे भारत शयनयान ३ नोव्हेंबरपासून धावणार

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई आणि बंगळुरूदरम्यान धावणारी पहिली वंदे भारत शयनयान एक्स्प्रेस ३ नोव्हेंबरपासून नियमित प्रवासी सेवेत दाखल होणार आहे. या गाडीचे १ नोव्हेंबरला उद्घाटन होणार असून, गुरुवारी ही एक्स्प्रेस मुंबईत दाखल झाली. नव्या रेल्वेसेवेमुळे मुंबई-बंगळुरू प्रवासाचा कालावधी सध्याच्या २२ ते २४ तासांवरून सुमारे १६ तासांवर येण्याची अपेक्षा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनस या मार्गावर धावणाऱ्या गाडीला १६ वातानुकूलित डबे आणि एकूण ८२३ बर्थ आहेत. यामध्ये तृतीय श्रेणीचे ११, द्वितीय श्रेणीचे चार आणि प्रथम श्रेणीचा एक डबा आहे.

गाडीत आरामदायी बर्थ, चार्जिंग पॉइंट, वाचनासाठी दिवे, स्वयंचलित दरवाजे, सीसीटीव्ही, टॉकबॅक यंत्रणा, अग्निसुरक्षा आणि धूर ओळखणारी उपकरणे आहेत.

दिव्यांग प्रवाशांसाठीही विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. या गाडीला कल्याण, पुणे, सोलापूर, कलबुरगी, यादगीर, रायचूर, गुंटकल आणि अनंतपूर या आठ स्थानकांवर थांबा प्रस्तावित आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील प्रवाशांना या सेवेमुळे फायदा होणार आहे. नियमित सेवेचे अंतिम वेळापत्रक आणि थांब्यांचा तपशील रेल्वे प्रशासनाच्या अधिकृत घोषणेनंतर स्पष्ट होणार आहे.



## धाराशिवमधील दोन लाख शेतकरी कुटुंबांना दिवाळी शिध्याचे वाटप

■ ठाणे प्रतिनिधी

ठाणे : दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते योजनेचा शुभारंभ करण्यात आला. शिध्यात सणासाठी आवश्यक साहित्याचा समावेश.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी दिवाळी शिधा मदत योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमातून सुमारे दोन लाख कुटुंबांना दिवाळीचा फराळ तयार करण्यासाठी साखर, मैदा, रवा, बेसन पीठ, डालडा, पणत्या, उटणे, लक्ष्मीची पावले आणि नवीन वर्षाचे कॅलेंडर असे साहित्य देण्यात आले.

या उपक्रमासाठी परिवहन मंत्री तथा शिवसेना नेते प्रताप सरनाईक आणि युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी सहकार्य केले.

निसर्गाच्या अवकृपेमुळे मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी केवळ आश्वासने न देता मदत शेतकऱ्यांच्या घरापर्यंत आणि बांधापर्यंत पोहोचली पाहिजे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. पुढील सहा महिने प्रत्येक शेतकऱ्याची चूल पेटती राहण्यासाठी लाखो हातांनी मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्रत्येक शिवसैनिकाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या घरातील चूल विझू नये आणि दुष्काळातही त्यांची दिवाळी अंधारात जाऊ नये, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.




## वांद्रे येथील त्रिरत्न बुद्ध विहारात वर्षावास कार्यक्रमाची सांगता

■ मुंबई प्रतिनिधी

वांद्रे पूर्व येथील प्रज्ञा सांस्कृतिक केंद्र, त्रिरत्न बुद्ध विहार यांच्या वतीने आयोजित वर्षावास कार्यक्रमाची संस्थेचे अध्यक्ष सुरेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली धार्मिक वातावरणात सांगता झाली. या निमित्ताने पूज्य भिक्खू संघाला भोजनदान व चिवरदान अर्पण करण्यात आले.

बौद्ध धम्मपरंपरेत वर्षावासाला विशेष महत्त्व असून, या काळात भिक्खू संघाकडून धम्माचे अध्ययन, चिंतन आणि उपासकांना मार्गदर्शन केले जाते. कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्यात भिक्खू संघाला श्रद्धापूर्वक भोजनदान व चिवरदान देण्यात आले. यावेळी भिक्खू संघाच्या वतीने उपस्थित उपासकांना संबोधित करण्यात आले. त्यांनी बौद्ध धम्माचे विचार, धम्माचरणाचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनात बुद्धांच्या शिकवणीचे पालन करण्याविषयी मार्गदर्शन केले. धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून बुद्ध, धम्म आणि संघाप्रती श्रद्धा व्यक्त करण्यात आली. उपस्थित उपासकांच्या सहभागात वर्षावास कार्यक्रमाची सांगता झाली.




## मेंढपाळाची लेक बनली वर्ग एक अधिकारी; उज्वला टिंगरेचे एमपीएससीत यश

■ सातारा प्रतिनिधी

सातारा : सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील झरे गावच्या उज्वला टिंगरे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यश मिळवत वर्ग एक अधिकारी होण्याचा मान मिळवला. मेंढपाळ वडील आणि शेतमजुरी करणाऱ्या आईच्या कष्टांचे चीज करत तिने प्रतिकूल परिस्थितीवर मात केली.

उज्वलाचे वडील श्रीरंग टिंगरे मेंढपाळ असून आई मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. पाच मुली आणि एक मुलगा अशा सहा अपत्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पेलताना आई-वडिलांनी आर्थिक अडचणींची पर्वा न करता मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले.

उज्वलाचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण झरे गावात झाले. मर्यादित शैक्षणिक सुविधा आणि कौटुंबिक परिस्थितीवर मात करत तिने अभ्यासातील सातत्य व जिद्दीच्या जोरावर एमपीएससी परीक्षेची तयारी केली. अखेर तिच्या मेहनतीला यश मिळाले.

या यशात आई-वडिलांचा त्याग, भावंडांची साथ आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. उज्वलाच्या निवडीमुळे झरे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून तिचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.



## आशुतोष दीक्षित हिंदुस्थानी हवाई दलाचे नवे प्रमुख

■ नवी दिल्ली : वृत्तसंध्य

नवी दिल्ली: एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांनी शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी हिंदुस्थानी हवाई दलाच्या २९ व्या प्रमुखपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांनी एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग (ए. पी. सिंग) यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारली. ४३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ए. पी. सिंग निवृत्त झाले आहेत.

एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित हे अनुभवी फायटर पायलट असून, त्यांना विविध प्रकारची लढाऊ विमाने उडवण्याचा ३ हजार ५०० तासांहून अधिक अनुभव आहे. त्यांचा जन्म ९ डिसेंबर १९६६ रोजी झाला. ६ डिसेंबर १९८६ रोजी ते हवाई दलाच्या फायटर स्ट्रीममध्ये दाखल झाले होते. आपल्या कारकिर्दीत त्यांनी ऑपरेशन रक्षक, कारगिल युद्ध आणि ऑपरेशन सफेद सागर यांसारख्या महत्त्वाच्या लष्करी मोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे.

हवाई दलाच्या प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी ते उपप्रमुख म्हणून कार्यरत होते. याशिवाय सेंट्रल एअर कमांडचे कमांडिंग-इन-चीफ आणि दक्षिण-पश्चिम एअर कमांडचे वरिष्ठ एअर स्टाफ ऑफिसर म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. देशाच्या पश्चिम आणि दक्षिण भागांतील महत्त्वाच्या फायटर बेसचे नेतृत्व करण्याचाही त्यांना अनुभव आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे हवाई दलाच्या नेतृत्वाची नवी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे.कर्मचाऱ्यांच्या दिवाळीच्या आनंदात आर्थिक अडचणींमुळे अडथळा येऊ नये, यासाठी प्रशासनाने वेतन वितरणाच्या प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे.



## मणिपूरच्या नोनीमध्ये हिंसाचार, सशस्त्र गटांमध्ये गोळीबार; कुकी-झो समुदायाच्या तीन सदस्यांचा मृत्यू

■ मणिपूर

मणिपूर : मणिपूरमधील नोनी जिल्ह्यात दोन सशस्त्र गटांमध्ये झालेल्या गोळीबारात कुकी-झो समुदायाच्या तीन सदस्यांचा मृत्यू झाला. कुकी आदिवासी संघटना कुकी इनपी मणिपूर (KIM) यांनी या घटनेची माहिती दिली. नॅशनल सोशलिस्ट कौन्सिल ऑफ नागालिम-इसाक मुइवा (NSCN-IM) आणि झिलियानग्रोंग युनायटेड फ्रंट (ZUF-K) च्या कामसान गटाच्या सशस्त्र कार्यकर्त्यांनी ही हत्या केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

दोन सशस्त्र गटांमध्ये झालेल्या गोळीबारात तिघांचा मृत्यू झाल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. या घटनेबाबत अधिक माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे.

कुकी इनपी मणिपूरने राज्य सरकारवर कुकी-झो गावांना पुरेशी सुरक्षा देण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे. वारंवार धोक्याच्या सूचना देऊनही प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या नाहीत, असे संघटनेचे माहिती व प्रसिद्धी सचिव झांगहाओलुन हाओकिप यांनी सांगितले. सुरक्षेच्या अभावामुळे गावकऱ्यांनाच स्वतःच्या घरांचे आणि समुदायाचे संरक्षण करण्यासाठी पुढे यावे लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या हत्याकांडानंतर मृतदेहांची विटंबना करण्यात आल्याचा आरोपही संघटनेने केला आहे.

घटनेला जबाबदार असलेल्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी आणि नोनी जिल्ह्यातील संवेदनशील गावांमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढवावी, अशी मागणी कुकी इनपी मणिपूरने राज्य सरकारकडे केली आहे.



## जनगणना कधी होणार? सरकारकडून अखेर तारखा जाहीर

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था

नवी दिल्ली: केंद्र सरकारने बहुप्रतीक्षित राष्ट्रीय जनगणना २०२७ चे वेळापत्रक जाहीर केले आहे. देशातील बहुतांश राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत जनगणनेचे काम पूर्ण केले जाणार आहे. पीटीआयने याबाबतची माहिती दिली आहे. बर्फवृष्टी आणि प्रशासकीय परिस्थिती लक्षात घेता काही भागांना या वेळापत्रकातून वगळण्यात आले आहे. मणिपूरमध्ये पुढील घोषणा होईपर्यंत जनगणनेची प्रक्रिया स्थगित राहणार आहे. तसेच गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, लडाख, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमधील बर्फवृष्टी होणाऱ्या भागांसाठी स्वतंत्र वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.

या जनगणनेत नागरिकांना स्वतःहून माहिती नोंदवण्याची सुविधाही मिळणार आहे. त्यासाठी १० ते २४ जानेवारी २०२७ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. घराघरांत जाऊन प्रत्यक्ष जनगणना सुरू होण्यापूर्वी नागरिकांना आपली माहिती ऑनलाइन नोंदवता येणार आहे.

देशात यापूर्वी २०११ मध्ये जनगणना झाली होती. २०२१ मध्ये जनगणनेचे नियोजन करण्यात आले होते. एप्रिल ते सप्टेंबर २०२० मध्ये पहिला, तर फेब्रुवारी २०२१ मध्ये दुसरा टप्पा राबविण्याचे ठरले होते. मात्र, कोरोना महामारीचा प्रादुर्भाव वाढल्याने ही प्रक्रिया अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली. आता २०२७ च्या नव्या वेळापत्रकामुळे जनगणनेचा मार्ग मोकळा झाला आहे. ही प्रक्रिया 'जनगणना अधिनियम, १९४८' आणि 'जनगणना नियम, १९९०' नुसार पार पडणार आहे.



## मुंबईत साताऱ्यातील दोघे ६६ लाखांच्या गांजासह अटकेत

स्वप्नील गाडे, गुन्हे वार्ताहर

**मुंबई**: मुंबईतील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने हायड्रो गांजाची विक्री करण्यासाठी आलेल्या सातारा जिल्ह्यातील दोन तरुणांना अटक केली. त्यांच्याकडून १ किलो ८९६ ग्रॅम वजनाचा आणि अंदाजे ६६ लाख ३६ हजार रुपये किमतीचा हायड्रो गांजा जप्त करण्यात आला.

२९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.५० वाजण्याच्या सुमारास अंधेरी पूर्व येथील जे. के. इंडस्ट्रियल इस्टेटजवळील पेपर बॉक्स रोड परिसरात पोलिसांना दोन तरुण संशयास्पदरीत्या फिरताना आढळले. पोलिसांनी त्यांना हटकताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता लाल रंगाच्या प्लास्टिक पिशवीत हायड्रो गांजा आढळला.

ओमकार राजेंद्र पवार (वय २८, रा. भाकरवाडी) आणि पियुष मधुकर घोंगडे (वय २२, रा. वाठार स्टेशन, ता. कोरेगाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोघे सातारा जिल्ह्यातून मुंबईत हायड्रो गांजा विक्रीसाठी आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२४४/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ८ (क), २० (ब) व २९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक रणजीत गोंदुकुणे, पोलीस हवालदार गौतम बडे, बाबू येडगे, सचिन ठोंबरे तसेच पोलीस शिपाई लोखंडे व बिनल शिंगाणे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केली.




## चेंबूरमध्ये ७५ हजारांचे कोडेन कफ सिरप जप्त; एकाला अटक

सुधाकर नाडर, मुंबई

मुंबई : अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या वरळी युनिटने चेंबूर येथे कारवाई करून ७५ हजार रुपये किमतीच्या कोडेन कफ सिरपच्या ७५ बाटल्या जप्त केल्या. याप्रकरणी एका इसमाला अटक करण्यात आली.

व्ही. एन. पी. आणि आर. सी. मार्ग जंक्शन येथील मोनोरेल स्टेशनखाली २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे २.२० ते ४.३० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. संशयास्पद हालचाली करणाऱ्या इसमाची तपासणी केली असता त्याच्याकडे १०० मिली क्षमतेच्या ७५ बाटल्या आढळल्या.

जप्त करण्यात आलेल्या बाटल्यांची एकूण संख्या ७५ असून, त्यांची किंमत ७५ हजार रुपये आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या पथकाने संशयास्पद हालचालींच्या आधारे संबंधित इसमाची तपासणी केली. या तपासणीत कोडेनयुक्त कफ सिरपच्या बाटल्या आढळल्यानंतर पोलिसांनी त्या जप्त केल्या. या प्रकरणात संबंधित इसमाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या कफ सिरपचा साठा कोठून आणण्यात आला होता आणि त्याचा पुढे कोणत्या कारणासाठी वापर केला जाणार होता, याबाबत तपासाच्या अनुषंगाने माहिती घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.

कोडेनयुक्त कफ सिरपचा वापर वैद्यकीय सल्ल्यानुसार खोकला कमी करण्यासाठी केला जातो. मात्र, त्यातील कोडेनचा गैरवापर नशेसाठी केल्यास गुंगी येणे, अवलंबित्व निर्माण होणे आणि श्वासोच्छ्वास मंदावण्याचा धोका असतो. याप्रकरणी एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम ८(क) सह २२(क) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त कृष्णकांत उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर हिरडेकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. वरळी युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक संतोष यांच्यासह संबंधित पथकाचा या कारवाईत समावेश होता.




## निर्मल नगर पोलिसांची कारवाई; तीन सराईत चोरटे अटकेत, दोन गुन्हे उघड

स्वप्नील गाडे, गुन्हे वार्ताहर

**मुंबई**: निर्मल नगर पोलिसांनी तीन सराईत चोरट्यांना अटक करुन निर्मल नगर आणि शाहूनगर पोलीस ठाण्यांतील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. आरोपींकडून एक टाटा एस टेम्पो, एक टोयोटा रुमियन कार आणि टेम्पोमधील कपड्यांच्या गोण्या असा एकूण 1 लाख 65 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी ओला-उबरसाठी वापरली जाणारी टोयोटा रुमियन कार घेऊन परिसरात रेकी करत असत. त्यानंतर रस्त्यावर उभे असलेले मालाने भरलेले टेम्पो चोरी करत असल्याचे तपासात समोर आले. घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही पोलिसांनी तांत्रिक कौशल्याच्या आधारे आरोपींची ओळख पटवली.

वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, वांद्रे पूर्व येथे कारचा पाठलाग करुन पोलिसांनी आरोपींना शिताफीने ताब्यात घेत अटक केली.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) सूर्यकांत पारटकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिसांकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून, संबंधित बाबींची तपासणी केली जात आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांच्या पथकाने सहभाग घेतला असून, पुढील तपासाच्या दृष्टीने आवश्यक माहिती संकलित केली जात आहे. पोलीस उपनिरीक्षक संतोष कोळगे हे तपास अधिकारी आहेत. या कारवाईत पोलीस हवालदार खंडारे, वाघमारे, परदेशी तसेच पोलीस शिपाई भोगले, कदम आणि कोळी यांचा समावेश होता.



## अँटॉप हिल पोलिसांच्या तत्परतेने २१ वर्षीय युवकाचे प्राण वाचले

सुधाकर नाडर, मुंबई

**मुंबई**: मुंबईतील अँटॉप हिल परिसरातील बंगाली पुरा येथे २५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८.१० च्या सुमारास एका इमारतीच्या नवव्या मजल्यावरील गच्चीच्या टोकावर २१ वर्षीय युवक आत्महत्येचा प्रयत्न करत असल्याची माहिती अँटॉप हिल पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अर्चना पाटील, पोलीस हवालदार अमित खंदारे, भानुदास चव्हाण आणि निकम यांनी घटनास्थळी धाव घेतली.

आई-वडिलांशी झालेल्या भांडणामुळे नैराश्यातून युवकाने हे पाऊल उचलल्याचे




समोर आले. पोलिसांनी त्याचे मन परिवर्तन करून अत्यंत कौशल्याने त्याला गच्चीच्या कठड्यावरून सुरक्षित खाली उतरवले. त्यानंतर युवकासह त्याच्या आई-वडिलांना समजावून सांगण्यात आले. पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) मनोज कुमार शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त विक्रम देशमाने, पोलीस उपायुक्त अनुराग जैन, सहायक पोलीस आयुक्त महेंद्र मोरे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक अर्चना पाटील आणि त्यांच्या पथकाच्या तत्परतेमुळे युवकाचे प्राण वाचले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये धक्कादायक घटना; आईने सहा वर्षांच्या मुलासह १८ व्या मजल्यावरून मारली उडी

पुणे प्रतिनिधी

पुणे : पिंपरी-चिंचवडमधील थेरगाव-वाकड परिसरातील सिग्नेचर पार्क या उच्चभ्रू सोसायटीत शुक्रवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास धक्कादायक घटना घडली. एकता भांगड (३३) यांनी मुलगा माधव भांगड (६) याच्यासह इमारतीच्या १८ व्या मजल्यावरून उडी मारून जीवन संपवले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. एकता या पती मनोज भांगड आणि मुलगा माधव यांच्यासोबत गेल्या काही वर्षांपासून सोसायटीत राहत होत्या. भांगड कुटुंब मूळचे राजस्थानचे असून पती मनोज हे आयटी कंपनीत नोकरीला आहेत. घटनेची



माहिती मिळताच वाकड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. आईने चिमुकल्या मुलासह हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून कुटुंबीय आणि शेजाऱ्यांची चौकशी सुरू असून वैयक्तिक किंवा कौटुंबिक कारणांच्या शक्यतेसह या प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे.

## कर्जवसुलीच्या जाचातून शेतकऱ्याचा मृत्यू; फायनान्स चालकासह नऊ जणांना अटक

नांदेड प्रतिनिधी

**हिंगोली**: नांदेड शहरातील हिंगोली गेट ब्रिजजवळ के.एफ. फायनान्सच्या कार्यालयात माळकौठा येथील चंद्रकांत शिंदे यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला होता. कर्जवसुलीसाठी धमक्या देऊन शिंदे यांचे अपहरण करण्यात आले आणि कार्यालयात डांबून मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी अपहरण व खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केलेल्या एसआयटीने नांदेड व परभणी येथे कारवाई करून सर्व नऊ आरोपींना अटक केली. यापूर्वी जयकुमार गायकवाड, शेख आमेर शेख हुसेन आणि इम्रान खान शहाबाज खान यांना २६ ऑक्टोबर रोजी अटक झाली होती. त्यांची पोलीस कोठडी ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली.

उर्वरित आरोपींमध्ये के.एफ. फायनान्सचा चालक हरप्रितसिंघ उर्फ मंटू नरेंद्रसिंघ मेजर, कुबेरफल पतसंस्थेचा सचिव सतपालसिंघ किशनसिंघ खालसा, शेख शोएब शेख महेमूद, शेख मुद्दसीर शेख खदीर, शेख अहेमद उर्फ अस्लम महंमद बशीर आणि सुमेध डोईबळे यांचा समावेश आहे. अव्वाच्या सव्वा व्याजवसुली करून शेतकरी, शेतमजूर व गरीब नागरिकांना त्रास दिल्याच्या तक्रारींचीही चौकशी सुरू आहे. पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अतुल भोसले, सहायक निरीक्षक गोविंद खैरे व पथकाने ही कारवाई केली.



## साताऱ्यात भांडण सोडविणाऱ्या पोलिसांना काठीने मारहाण; सात जणांवर गुन्हा

सातारा : प्रतिनिधी

**सातारा**: जिल्हा शासकीय रुग्णालयासमोर सुरू असलेले भांडण सोडविण्यास गेलेल्या पोलिसांनाच हाताने आणि काठीने मारहाण केल्याची घटना दि. २७ रोजी रात्री सातच्या सुमारास घडली. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रुग्णालयाच्या अपघात विभागासमोर काही जण एका व्यक्तीला मारहाण करत होते. यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस कॉन्स्टेबल अनिकेत बनकर आणि महिला पोलीस घार्गे यांनी मारहाण थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, संशयितांनी दोन्ही पोलिसांच्या अंगावर धावून जात त्यांना हाताने व काठीने मारहाण केली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

याप्रकरणी उत्कर्ष रेपाळ, आदिती रेपाळ, आदित्य रेपाळ, अंकुश उत्कर्ष रेपाळ (सर्व रा. सदरबझार), तेजस खंडू लवटे (रा. खेड), आर्यन तुपे (रा. जुना आरटीओ चौक, सातारा) आणि एका अनोळखी युवकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस कॉन्स्टेबल अनिकेत बनकर यांनी फिर्याद दिली असून, सहायक पोलीस निरीक्षक बिले तपास करत आहेत.




## खोपोलीतील गुन्ह्यातील तीन आरोपी तासवडे टोलनाक्यावर जेरबंद

सातारा प्रतिनिधी

**सातारा**: रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे गुन्हा करून कराडच्या दिशेने पसार होणाऱ्या तीन आरोपींना तळबीड पोलिसांनी तासवडे टोलनाक्यावर सापळा रचून अटक केली. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची ह्युंदाई वेरना कार जप्त करण्यात आली.

खोपोली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये दाखल गुन्हा क्रमांक ३८४/२०२६ मधील संशयित वेरना कारमधून येत असल्याची गोपनीय माहिती तळबीड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील तासवडे टोलनाक्यावर नाकेबंदी करून कारसह तिघांना ताब्यात



घेण्यात आले. त्यामध्ये निशांत बंडू पाटील (३५, रा. खराळे, ता. शिराळा, जि. सांगली), अमर जयसिंग पाटील (३६, रा. नांदगाव, ता. कराड) आणि संग्राम शिवाजी पाटील (३३, रा. काले, ता. कराड) यांचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली काडुकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तळबीडचे प्रभारी अधिकारी रवींद्र भोरे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पथकात पीएसआय सुभाष फडतरे, पोलीस हवालदार राघू खाडे, योगेश भोसले, सचिन गुरव तसेच पोलीस अंमलदार अभय मोरे, प्रवीण गायकवाड आणि संजय मासाळ यांचा समावेश होता.

## १५० सीसीटीव्ही फुटेजच्या तपासातून घरफोडी टोळीचा पर्दाफाश; चौघांना अटक

रणजित मस्के, गुन्हे वार्ताहर

**पुणे**: जुन्नर तालुक्यात घरफोड्या करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा आणि ओतूर पोलिसांनी पकडले. या कारवाईत चार आरोपींना अटक करून ३६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ओतूर ते नाशिक मार्गावरील सुमारे १५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून पोलिसांनी संशयित कारचा माग काढला. ओतूर पोलीस ठाण्यात ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दाखल झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याच्या तपासातून चार गुन्हे उघडकीस आले.

वसीम मुनीर पठाण (२९), अदनान युनुस पठाण (२६) आणि सोनू उर्फ मोहम्मद शारीफ रसूल शेख (४०), तिघेही लासलगाव, ता. निफाड, जि. नाशिक येथील रहिवासी, तसेच चोरीचे दागिने विकत घेणारा सागर अशोक शिंदे (३०) यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून १९ तोळे सोने, २ किलो




७७० ग्रॅम चांदी, दोन लाख रुपये रोख, गुन्ह्यात वापरलेली कार आणि वायरलेस वॉकी-टॉकी जप्त करण्यात आले.

पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, डॉ. शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, ओतूरचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव व पथकातील कर्मचाऱ्यांचा या कारवाईत समावेश होता.

पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव करीत आहेत.

## बांद्र्यात दीड कोटींचा चरस जप्त; ४० वर्षीय आरोपीला अटक

स्वप्नील गाडे, गुन्हे वार्ताहर

**मुंबई**: मुंबईतील बांद्रा पश्चिम परिसरात घरातून अंमली पदार्थांची विक्री होत असल्याच्या गोपनीय माहितीवरून गुन्हे शाखा युनिट ९ च्या पथकाने २४ ऑक्टोबर २०२६ रोजी छापा टाकला. या कारवाईत १ किलो ५०५ ग्रॅम वजनाचा, आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार अंदाजे दीड कोटी रुपये किमतीचा चरस जप्त करण्यात आला. या प्रकरणी ४० वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली असून, एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या आणखी एका पाहिजे आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण-१) नवनाथ ढवळे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-पूर्व) धर्मपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक सचिन पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र पाटील व विजय धोत्रे, पोलीस उपनिरीक्षक कल्याण पाटील व ऋषीकेश बाबर, सहाय्यक पोलीस फौजदार सुभाष शिंदे, पोलीस हवालदार राहुल पवार, पोलीस शिपाई राकेश कदम व रविंद्र वाघमारे आणि महिला पोलीस शिपाई पुनम जगताप यांचा समावेश होता.




हे मराठी साप्ताहिक मालक, प्रकाशक, निखिल एकनाथ गाडे यांनी मुद्रक सोमानी प्रिंटिंग प्रेस गाळा नंबर 4, तळमजला, एन, के. इंडस्ट्रियल इस्टेट, आरे रोडच्या समोर, प्रवासी इंडस्ट्रियल इस्टेट,च्या बाजूला, गेट नंबर 2, गोरेगाव (पूर्व) मुंबई 400063 येथे छापून, 905, ओम साई एसआरए, हाऊसिंग सोसायटी लि. गणपत, मुंबई उपनगर 400051, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपादक एकनाथ दगडू गाडे (मो 9821349985)